www.rajdand.com
सातारा, मंगळवार
07.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ शु.११
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



तुर्कस्तान की भूकंपस्थान...
पान ४ वर..

# केंद्र सरकारविरोधात काँग्रेस आक्रमक

## ▪ देशभरातील एसबीआय, एलआयसीच्या कार्यालयासमोर आंदोलन, राज्यातही निदर्शनं
## ▪ अशोक चव्हाणांच्या नेतृत्वाखाली पुण्यात काँग्रेसचं आंदोलन

**मुंबई : केंद्र सरकारविरोधात काँग्रेसने आज देशभरात आंदोलन केले. महाराष्ट्राच्या विविध भागात देखील काँग्रेसने आंदोलन केले. अदानी समुहातील गैरकारभाराची आणि हिंडेनबर्गच्या अहवालाची संयुक्त संसदीय समितीमार्फत किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या देखरेखीखाली चौकशी करावी, एलआयसी, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर सरकारी वित्तीय संस्थामधील अदानी समूहात केलेल्या गुंतवणुकीची संसदेत चर्चा व्हावी व गुंतवणूकदारांच्या पैशाला शासनाने संरक्षण द्यावे अशा मागण्या काँग्रेसने आपल्या आंदोलनातून केल्या.**




माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाणांच्या नेतृत्वाखाली पुण्यात काँग्रेसने केंद्र सरकारविरोधात आंदोलन केलं. यावेळी त्यांनी हे आंदोलनं नसून हा सामान्यांचा जन आक्रोश असल्याचं म्हटलं. ''आमच्या भविष्याच्या बाबतीत सरकार नेमकी काय आणि कधी भूमिका घेणार हे माहिती नाही. सामान्य माणसाने रस्त्यावर उतरलं, पाहिजे काँग्रेस पक्ष सामान्य माणसांसोबत आहे. आपणं सगळे एकत्र येऊन आंदोलनं करूया. आज देशभर आंदोलनं होत आहेत. अनेक लोकांचे पैसे एलआयसीमध्ये गुंतेलेले आहेत. देशात आज खूप वेगळी परिस्थिती निर्माण झाली आहे. केंद्र सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा. सरकारने कारवाई केली पाहिजे. एसबीआय आणि एलआयसीमधील सामान्य लोकांचा पैसा अदानी यांच्या शेअरमध्ये गुंतवले. परंतु, अदानी यांचे शेअर कोसळले आणि सामान्य लोकांचे पैसे बुडाले, ही चिंतेची बाब आहे. सध्या अदानींच्या सगळ्या कंपनी तोट्यात सुरू आहेत. रिपोर्टवर आणि अहवालावर सरकारने आधीच लक्ष द्यायला हवं होतं. तुम्ही गुंतवलेले पैसे तुम्हाला मिळालेच पाहिजे हीच आमची केंद्र सरकारकडे मागणी आहे, असे मत अशोक चव्हाण यांनी यावेळी म्हटले.

काँग्रेसच्या वतीने भंडाऱ्यात आंदोलन केलं. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या शहरातील मिस्किन टँक गार्डन परिसरात असलेल्या एसबीआय बँकेसमोर काँग्रेसने निदर्शने आणि आंदोलन केले. यावेळी महिला, काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एलआयसी आणि स्टेट बँक ऑफ इंडिया या सार्वजनिक वित्तीय संस्थांना अदानी उद्योग समुहात गुंतवणूक करण्यास भाग पाडून सर्वसामान्यांचे आर्थिक नुकसान करणार्या केंद्रातील मोदी सरकारच्या विरोधात काँग्रेसने सोमवावारी राज्यव्यापी आंदोलन केले. धुळे शहरात देखील एलआयसी आणि एसबीआय कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. पक्षाचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील, जिल्हाध्यक्ष श्याम सनेर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अदानी आणि मोदी सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

अदानी उद्योग समुहामध्ये एलआयसी, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांना कोट्यवधी रूपये गुंतवण्यात मोदी सरकारने भाग पाडले. एलआयसीचे २९ कोटी गुंतवणूकदार आणि स्टेट बँकेच्या ४९ कोटी खातेदारांचा कष्टाचा पैसा परत मिळेल का? अशी भीती निर्माण झाली आहे. एलआयसी आणि स्टेट बँक ऑफ इंडिया आपल्या देशाचे गौरव आहेत. या वित्तीय संस्थामध्ये सर्वसामान्य, मध्यमवर्ग, नोकरदार, छोटे व्यापारी यांनी आपल्या मेहनतीचा पैसा गुंतवला आहे. परंतू मोदी सरकारने अदानीच्या कंपन्यांमध्ये हा पैसा बळजबरीने गुंतवला. त्यामुळे अदानी उद्योग समुहातील गैरकाराभाची चौकशी व्हावी अशी मागणी आंदोलकांनी केली.

उस्मानाबाद जिल्हा काँग्रेस एलआयसी ऑफिस समोर उद्योगपती गौतम आदानी यांच्या विरोधात घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. अदानी उद्योग समुहातील गैरकारभाराची चौकशी करावी आणि ङखउ, ङइख सह इतर सरकारी वित्तीय संस्थांच्या अदानी समुहातील मोठ्या प्रमाणातील गुंतवलेल्या पैशाला संरक्षण मिळावे, यासाठी केंद्र सरकारने योग्य ते निर्णय घ्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

नवी मुंबई जिल्हा काँग्रेसने आज केंद्रातील मोदी सरकार विरोधात आंदोलन केले. वाशी येथील एलआयसी कार्यालयाबाहेर काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकत्रित येत मोदी सरकारचा निषेध व्यक्त केला. मोदी सरकारने एलआयसीला अदानी कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडले असल्याचा आरोप करत यावेळी मोदी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. सरकार अदानी आणि अंबानीसाठी काम करत असल्याचा आरोप करत मोदी सरकार हटावचा नारा देण्यात आला.

अदानी समुहाच्या कंपन्यांमध्ये सरकारी वित्तीय संस्थांचा पैसा नियम डावलून गुंतवल्याचा आरोप करत आज परभणीत काँग्रेसच्या वतीने एसबीआय आणि एलआयसीच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेसच्या नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी केंद्र सरकार आणि अदानी समुहाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनात मोठ्या संख्येने काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# वंचितला आघाडीत घेण्यास आमचा विरोध नाही

## नाना पटोले यांच्यासह काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांचा निर्वाळा



**पुणे : प्रतिनिधी**
वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेनेची युती झाल्यानंतर वंचितला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्यास आमची कोणतीही हरकत नाही. विरोधही नाही, असा स्पष्ट निर्वाळा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांनी दिला.

अदानी उद्योग समूहात स्टेट बँक ऑफ इंडिया एलआयसी या सार्वजनिक क्षेत्रातील वित्त संस्थांनी केलेल्या गुंतवणुकीमुळे सर्वसामान्य नागरिकांचा निधी धोक्यात येण्याची शक्यता असल्याने शहर व जिल्हा काँग्रेसच्या वतीने अलका टॉकीज चौकातील एलआयसी बिल्डिंग समोर निदर्शने करण्यात आली. या आंदोलनानंतर पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला.

वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्यामध्ये काँग्रेसला कोणतीही अडचण नाही, असे पटोले यांनी स्पष्ट केले. वंचितने काँग्रेसबरोबर यावे यासाठी आम्ही तब्बल सात वर्ष प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा करीत आहोत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाशी युती झाल्यानंतर वंचित महाविकास आघाडीत सहभागी होणार असेल तर त्यांचे स्वागतच आहे, असे अशोक चव्हाण यांनी सांगितले.

सत्यजित तांबे यांनी केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात कोणतेही नाराजीनाट्य अथवा दुफळी नाही, असा दावाही या नेत्यांनी केला. आम्ही सर्वजण एकत्र आहोत आणि एकोप्याने पक्षाचे काम करत आहोत, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले. याबाबत सध्या दिसत असलेले अथवा दाखविले जात असलेले चित्र लवकरच पालटलेले दिसेल, असा दावा सुशीलकुमार शिंदे यांनी केला.

# कसब्यात हिंदू महासभा देणार आनंद दवे यांना उमेदवारी

## ब्राह्मण समाजाला डावलल्याने लढविणार निवडणूक

**पुणे: प्रतिनिधी**
कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात ब्राह्मण समाजाचे मताधिक्य मोठ्या प्रमाणावर असूनही या समाजातील उमेदवाराला डावलल्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. हिंदू महासभेच्या वतीने दवे यांना उमेदवारी देण्यात येणार आहे.

दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर होत असलेल्या पोटनिवडणुकीत टिळक कुटुंबातील व्यक्तीला उमेदवारी द्यावी अशी मागणी त्यांचे पती शैलेश टिळक यांनी केली होती. मात्र, भारतीय जनता पक्षाने स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने यांना उमेदवारी दिली आहे.

भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष आणि विद्यमान मंत्री चंद्रकांत पाटील यांना सुरक्षित मतदारसंघ देण्यासाठी मागच्या विधानसभा निवडणुकीत मेधा कुलकर्णी यांच्याकडून कोथरूड मतदारसंघ काढून घेण्यात आला. आता कसबा मतदारसंघात प्राबल्य असूनही टिळक कुटुंबीयांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे ब्राह्मण समाज नाराज असल्याचा इशारा काही संघटनांनी भाजपाला दिला आहे.

त्याचाच परिणाम म्हणून हिंदू महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे हे निवडणूक लढवणार आहेत. या मतदारसंघात ब्राह्मण मतदारांची संख्या सुमारे २५ ते ३० टक्के तर मराठा व बहुजन समाजाची मतदारसंघ तीस ते पस्तीस टक्के एवढी आहे. तब्बल २२ वर्ष या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व गिरीश बापट यांनी केले आहे त्यांच्यापूर्वी दीर्घकाळ अण्णा जोशी आणि त्यांच्याही यादी अरविंद लेले यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. त्यामुळे या मतदारसंघातून ब्राह्मण उमेदवार खात्रीने निवडून येईल असा विश्वास हिंदू महासभेला वाटत आहे.

# ...तर टिळकांच्या कुटुंबातील व्यक्तीला उमेदवारी देऊ

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही

**पुणे : प्रतिनिधी**
कसबा विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक बिनविरोध होणार नसल्याचे जवळजवळ स्पष्ट झाले असले तरीही भारतीय जनता पक्ष आपल्या आग्रहावर ठाम आहे. जर महाविकास आघाडी आपला उमेदवार मागे घेऊन निवडणूक बिनविरोध करणार असेल तर अजूनही उमेदवार बदलू आणि टिळकांच्या घरातील व्यक्तीला उभे करू, अशी ग्वाही भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांचे पती शैलेश यांची टिळक कुटुंबातच उमेदवारी द्यावी, अशी मागणी होती. मात्र, पक्षाने स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

ब्राह्मण समाजाला उमेदवारी न दिल्याने रासने यांच्या उमेदवारीला ब्राह्मण संघटनांकडून विरोध होत आहे. याचा फायदा उठविण्याच्या प्रयत्नात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आपण टिळक कुटुंबातील रोहित टिळक यांना उमेदवारी देऊ, असे विधान केले होते. प्रत्यक्षात रवींद्र धंगेकर यांना तिकीट जाहीर झाले आहे.



या दरम्यान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीचा उमेदवार नसेल तर टिळकांना उमेदवारी देऊ, असे सांगितले. बावनकुळे यांनी त्याचीच री ओढत महाविकास आघाडीने माघार घेतल्यास उद्याच्या दिवसात उमेदवार बदलू, असे सांगितले आहे.

# कसबा पोटनिवडणुकीत दाभेकर करणार बंडखोरी

## काँग्रेसला करावा लागणार अडचणींचा सामना

**पुणे : प्रतिनिधी**
कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत वेगवेगळे रंग भरू लागले आहेत आणि त्यामुळे अनिश्चिततांमध्ये भर पडत आहे. काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष बाळासाहेब दाभेकर यांनी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आपली उमेदवारी जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे.



कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे प्राबल्य आहे. मात्र, या मतदारसंघात भाजपकडून उमेदवारी मागणाऱ्यांची संख्याही मोठी होती. स्थायी समिती अध्यक्ष हेमंत रासने यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर टिळक कुटुंबीयांना नाकारल्याबद्दल ब्राह्मण समाजाच्या वतीने विविध संस्था संघटनांनी भाजपवर संताप व्यक्त केला. हिंदू महासंघाचे आनंद दवे हे तर हिंदू महासभेच्या माध्यमातून प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे भाजपाच्या पारंपारिक मतांवर लक्षणीय परिणाम होण्याची चिन्ह आहेत.

दुसरीकडे, काँग्रेसचा परंपरागत मतदारसंघ असूनही महाविकास आघाडीमध्ये या मतदारसंघावर शिवसेनेने आग्रही दावा केला. अखेर सर्वसंमतीने मतदारसंघ काँग्रेसकडे आल्यानंतर रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यांनी वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज जाहीर केल्यानंतर पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष बाळासाहेब दाभेकर यांनी बंडाचे निशाण उभारले आहे. या घडामोडींमुळे कसबा विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक उत्कंठावर्धक होत चालली आहे.

## आरळे येथून युवक बेपत्ता

**सातारा : प्रतिनिधी**
आरळे येथून युवक बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ३ फेब्रुवारी रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास आरळे, ता. सातारा येथील राहत्या घरातून आसिफ बंदेनवाज शेख हा फोटो काढायला सातारा येथे जातो, असे सांगून कुठेतरी निघून गेला आहे. याबाबतची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून पोलीस नाईक घोरपडे तपास करीत आहेत.

# अविनाश बागवे भाजपच्या वाटेवर

## कसबा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठा धक्का

**पुणे : प्रतिनिधी**
मागील काही काळापासून काँग्रेसमध्ये अस्वस्थ असलेले नगरसेवक अविनाश बागवे हे भाजपाच्या वाटेवर असल्याची माहिती पक्षाच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली. येथे आठवड्यावरच्या काळात बागवे हे भाजपामध्ये प्रवेश करतील, असे सूत्रांनी सांगितले.

अविनाश बागवे हे काँग्रेसचे तरुण आणि अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळखले जातात. त्याचप्रमाणे त्यांचा जनसंपर्कही दांडगा आहे. पक्षाने आयोजित केलेल्या आंदोलनांबरोबरच जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यात त्यांचा नेहमीच पुढाकार राहिला आहे. त्यामुळे कसबा विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीच्या तोंडावर बागवे यांच्यासारख्या नेत्याने पक्षातून बाजूला होणे हा काँग्रेससाठी मोठा धक्का असणार आहे.

पक्षाच्या स्थानिक नेतृत्वावर मागील काही काळापासून बागवे हे नाराज आहेत. मागील काही काळात पक्षाने आयोजित केलेल्या अनेक कार्यक्रमात त्यांची अनुपस्थिती जाणवण्याजोगी होती. कसबा पोटनिवडणुकीबरोबरच लवकरच येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या स्थानिक नेत्यांनी बागवे यांच्यासारखा मोठा मासा गळाला लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

# कृष्णा-वेण्णा महोत्सवाची रथोत्सवाने सांगता

## विविध धार्मिक कार्यक्रमाने रंगला कृष्णा वेण्णा महोत्सव

**सातारा : प्रतिनिधी**
गेले दोन वर्ष करोना मुळे विविध प्रकारचे धार्मिक विधी बंद करण्यात आले होते मात्र यंदा दक्षिणकाशी असणाऱ्या श्रीक्षेत्र माहुली मध्ये कृष्णा वेण्णा महोत्सवाची रथोत्सवाने मोठ्या उत्साहात सांगता झाली. या महोत्सवांमध्ये परिसरातील हजारो भाविक जमा झाले होते.



कृष्णा वेण्णा महोत्सवाचे साताऱ्याच्या सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रामध्ये मोठे महत्त्व आहे कृष्णा वेण्णा संगमावर संगम माहुली हे गाव वसले असल्याने त्याला दक्षिणकाशी असेही संबोधले जाते येथेच वेण्णा नदी आणि कृष्णा नदी यांचा मनोहरी संगम होतो या संगमा प्रति भाविकांची श्रध्दा आहे . या नद्यांच्या पाण्यामधून सिंचन होऊन सर्व भूमी सुजलाम सुफलाम व्हावी या हेतूने या महोत्सवाचे आयोजन केले जाते दोन वर्ष करोनाच्या प्रादुर्भावामुळे हा महोत्सव होऊ शकला नव्हता. यंदा हा महोत्सव दिनांक १ फेब्रुवारी ते ५ फेब्रुवारी या दरम्यान रंगला या महोत्सवात कीर्तन सेवा भजन सेवा महाप्रसाद माहेरवाशींणींसाठी हळदीकुंकू असे विविध कार्यक्रम मोठ्या भक्ती भावांमध्ये पार पडले कृष्णा वेण्णा महोत्सवाचे मोठ्या आकर्षण असलेल्या रथोत्सव रविवारी सकाळी मोठ्या उत्साहात पार पडला हजारो भाविकांनी कृष्णेच्या पात्रात उभे राहून कृष्णा नदीची आरती म्हणली त्यानंतर सर्व भाविकांनी हा रथ कृष्णा नदीच्या पात्रातून ओढून नेण्यात आला यावेळी विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते.

## सातारा बसस्थानकातून महिलेच्या पाटलीची चोरी

**सातारा :** सातारा बस स्थानकातून महिलेच्या पाटलीची चोरी झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २८ डिसेंबर रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास रेखा भाऊसाहेब चव्हाण रा. सदर बाजार सातारा या सातारा ते मेढा जाणाऱ्या बसमध्ये चढल्या असता दरम्यान त्यांची २० ग्रॅम वजनाची, ६० हजार रुपये किंमतीची सोन्याची पाटली अज्ञात चोरट्याने चोरून नेली. आहे याबाबतची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून तपास सहाय्यक फौजदार पवार करीत आहेत.

# मद्रास उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्तीला विरोध

**चेन्नई : वृत्तसंस्था**
मद्रास उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त होणार्या वकील लक्ष्मणा चंद्र व्हिक्टोरिया गौरी यांच्या विरोधात काही वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. लक्ष्मणा चंद्र व्हिक्टोरिया गौरी या भाजपच्या सदस्या असल्याचा आरोप या वकिलांनी केला आहे. यासोबतच त्यांनी इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माच्या प्रचार आणि विस्ताराच्या पद्धतींवर आक्षेपार्ह लेख लिहिले असल्याचेही म्हटले आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी या प्रकरणावर उद्या म्हणजेच मंगळवारी ७ फेब्रुवारी रोजी सुनावणी घेण्याचे सांगितले आहे.

१७ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय कॉलेजियमने लक्ष्मणा चंद्र व्हिक्टोरिया गौरी यांच्या नावाची शिफारस केंद्र सरकारकडे पाठवली. सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने मद्रास उच्च न्यायालयाने पाठवलेल्या नावांमधून लक्ष्मणा चंद्र व्हिक्टोरिया गौरी यांच्यासह आठ नावे निवडून सरकारकडे पाठवली होती. त्यापैकी पाच जणांना दोन वर्षांसाठी मद्रास उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्याची अधिसूचना सोमवारी जारी करण्यात आली.

# मागासवर्गीय समाजाच्या विकास कामांसाठी आ. राम सातपुते यांचा ५ कोटींचा निधी : मिलिंद सरतापे

**अकलूज : प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील मागासवर्गीय समाजाला माळशिरसचे आ राम सातपुते यांच्या प्रयत्नाने मागासवर्गीय वस्ती मधील विविध सुधारणा कामाबाबत न भूतो न भविष्यती असा ५ कोटींचा निधी मिळाला असून या विकास कामांना लवकरच सुरुवात होणार असून विकासाच्या मुख्य प्रवाहात समाजाला आ राम सातपुते यांनी आणल्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने माळशिरसचे आ राम सातपुते यांचा लवकरच सत्कार करणार असल्याची माहिती आरपीआयचे माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी दिली ते माळशिरस येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.



**आ. राम सातपुते यांनी माळशिरस तालुक्यातील मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी ५ कोटींचा निधी दिला. त्याबद्दल आरपीआयच्या वतीने त्यांचे स्वागत करताना तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, दयानंद धाइंजे, किरण धाइंजे, समाधान भोसले, विनोद रणदिवे आदी.**

यावेळी या पत्रकार परिषदेस आरपीआयचे नेते दयानंद धाइंजे, जिल्हा युवा आघाडीचे कार्याध्यक्ष किरण धाईंजे, कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक सरचिटणीस प्रवीण साळवे , उपाध्यक्ष शेखर सावंत ,संघटक शिवाजी ठोकळे, संजय भोसले, विनोद रणदिवे, रमेश धाईंजे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी बोलताना मिलिंद सरतापे म्हणाले की ,माळशिरस तालुक्यातील जवळपास सर्वच गावांमध्ये आ राम सातपुते यांनी रस्ते ,पाणी, सभा मंडप, सौर ऊर्जा दिवे, अभ्यासिका, महापुरुषांच्या पुतळ्यांसाठी निधी आदी माध्यमातून मागासवर्गीय समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम आ सातपुते यांनी केले आहे गेल्या पंधरा वर्षाच्या कालावधीत मागासवर्गीय समाजाला सर्वात जास्त निधी आ सातपुते यांनी दिला आहे आणि भविष्यातही अजून जादाचा निधी आम्ही त्यांच्याकडे मागणार असून लवकरच त्याचीही पूर्तता होईल.

आ. राम सातपुते यांच्या कामाबाबत आरपीआय व मागासवर्गीय समाज समाधानी असून मागासवर्गीय समाजाचं प्रतिनिधित्व करणारे आ राम सातपुते यांनी समाजाशी आपली असणारी नाळ कायम ठेवली आहे याबाबत आम्ही समाधानी आहे मात्र ते ज्याप्रमाणे जनता दरबार घेऊन गोरगरिबांच्या अडीअडचणी सोडवतात त्याचप्रमाणे त्यांनी आमसभा घेऊन सर्वसामान्यांना न्याय द्यावा ही भूमिका आरपीआयचे पश्चिम महाराष्ट्राचे नेते दयानंद धाइंजे यांनी मांडली तर जिल्हा युवा आघाडीचे कार्याध्यक्ष किरण धाइंजे यांनी सांगितले की, आर पी आय गेल्या दहा वर्षापासून भाजपा बरोबर आहे आहे निधीच्या बाबतीत आ राम सातपुते यांच्या कामावर आम्ही समाधानी आहोत मात्र आम्हाला सत्तेत वाटा मिळत नाही यामुळे भविष्यात आम्हाला सत्तेतही वाटा मिळावा जिल्हा व तालुका स्तरावर असणाऱ्या विविध शासकीय समित्यांमध्ये आरपीआयच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सामावून घ्यावे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# नगरसेवक गडप झालेले अचानक प्रगटले

**बाणेर, बालेवाडी : रमेश जयस्वाल**

माजी नगरसेवक आणि भावी नवीन उमेदवार तसेच त्यांचे कार्यकर्ते महानगरपालीकेच्या निवडणूका लांबणीवर गेल्यामुळे तब्बल वर्ष, सव्वा वर्षापासून अनेकांना आपले खर्च परवडत नाही म्हणून बाणेर, बालेवाडी, औध, पाषाण येथील माजी नगरसेवक, भावी गुडघ्याला बाशिंग बाधलेले नवीन उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आपले कार्यालय बंद करून गायब झाले होते. यात इच्छूक उमेदवारांनी सुध्दा कार्यालयात येणे बंद केले होते. फोन केला तर उचलत नव्हते. अनेक महाभाग जिल्हा सोडून इतर ठिकाणी कुटूंबासह सफारीवर गेले होते तर काही विदेशात फेरफटका मारायला, समुद्रकिनारीचा आस्वाद घेण्यातच धन्यता मानत होते. जनतेला एकटे सोडून सफारीचा आनंद लूटतांना दिसले.

प्रभागातील कामे आणि सर्वसामान्य जनतेची कामे होत नसल्यामुळे मतदार अनभिन्न होते. हे भूमीगत झालेले माजी नगरसेवक किंवा भावी उमेदवारीचे इच्छुक कार्यकर्ते संक्रात आल्यामुळे एकदम अवतरले आणि महिलांना ऐकत्र आणून जणून काही आम्हाला तुमची फार काळजी आहे, असा आव आणून हळदीकुंकूचा कार्यक्रम करून वाणवाटप, भेट वाटप, साड्या वाटप केल्या. तर काहींनी हुरडा पार्टीचे आयोजन करून मतदारांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी शक्ती प्रर्दशन सुध्दा केले यामुळे मतदारांची संक्रात चांगली झाल्याचे दिसले.

अनेक माजी नगरसेवक किंवा कार्यकर्ते इतर वेळी सकाळीच आपल्या कार्यालयात हजेरी लावत होते; पण निवडणूका लांबल्या, खर्चाचा बोजा नको, पुढे यावेळी निवडून येण्यासाठी फार खर्च करावा लागणार आणि अनेक वृत्तपत्रांचे वर्धापन दिन साजरे होत आहे. तसेच नववर्षाच्या जाहिराती द्याव्या लागतील यामुळे पत्रकारांचे ससेमिरा नको म्हणून यांनी पळवाटीचा मार्ग अवलंबल्याचे दिसते. सर्वांनी एकच मार्ग अवलंबला. नववर्षानिमित्त आपल्या नावाने पक्षाला धरून कॅलेंडर छापून आम्ही जनतेची कशी कामे केली हे दर्शवून घराघरात कॅलेंडर वाटप करण्यातच धन्यता मानली.

अनेकांच्या घरी जावून वाढदिवस साजरे करणारे, निधन असो कि दहावळे स्वतःचे चेहरे दाखविणारे आज कॅलेंडरव्दारे स्वतःची उदोउदो करत असतीलतर ते पत्रकार आणि मतदारांच्या भरवश्यावरच.

पत्रकार हे लोकप्रतिनिधी, नगरसेवकांचे कार्य वृत्तपत्रांतून जनतेपर्यंत आणि शासनापर्यंत प्रसारमाध्यमापर्यंत पोहचवितो, मग यांच्यावर कानाडोळा का करायचा? खर्च करण्याचा मुद्दा हा वेगळा. रोडवर लागणारे मोठमोठाले बॅनर, साड्या वाटप, सरंजाम वाटप, पैठणी वाटप, मतदारांना भेटवस्तू वाटप, मोठमोठाले कार्यक्रम याचा खर्च कोणाच्या पैशातून होतो, हे सर्वसामान्य जनतेला माहीत आहे. याचा खर्चाचा चुना कोणाच्या खिशाला बसतो, हे मतदारांना माहीत आहे.

मोजकेच पत्रकार हाताशी धरून आपला उदोउदो करणारे किवा फेसबुकवर आपला पाढा वाचणारे इतर पत्रकारांना नगण्य समजत असतील तर ती फार मोठी चूक आहे, याचा विचार का करत नाही. भूमीगत होऊन किंवा पत्रकारांना टाळाटाळ करून ही बाब योग्य नाही. सर्वसामान्य पत्रकार आपल्यापर्यंत पोहचतात, आपली समस्या, आपले कार्य, जनतेच्या समस्या शासनापर्यंत मांडतात. यांच्यावर कानाडोळा का? आजची किंवा येणारी निवडणूक सोपी नाही याचा विचार करणे गरजेचे आहे. कधी कोणता नवखा उमेदवार पुढे येऊन याचा उदोउदो पत्रकार करतील हे ज्याने त्याने समजावे. पुढे काळ फार कठीण आहे.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**सातारा : प्रतिनिधी**

राहत्या घरात गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास गणेश राजेंद्र शिंगटे वय २७ रा. चंदन नगर, सातारा याने राहत्या घरी दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक सुतार करीत आहेत.

## भोरमध्ये महास्वराज्य अभियानाचे आयोजन - तहसीलदार सचिन पाटील

**भोर : प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील नागरिकांच्या विविध प्रकरणांचा निपटारा करण्याच्या उद्देशाने व महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शी करण्यासाठी मंगळवार (दि.७) रोजी भोर येथिल गंगोत्री हॉल मध्ये सकाळी १०:३० ते ५ यावेळेत महा स्वराज्य अभियानाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती भोरचे तहसिलदार सचिन पाटील यांनी दिली.

यावेळी महसुल विभागाच्या वतीने ई फेरफार नोंदी मंजुरी, कुळकायदा खालील जमिनींचा शर्तभंगाच्या प्रकरणांचा निपटारा करणे, भू संपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त प्रकरणांचा पत्रकाचा कामकाज, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ४२ब, ४२क, ४२ड, च्या अनुषंगाने माती व बिनशेती प्रकरणे व ई पीक पाहाणी करणे तसेच वनविभाग, पाट बंधारे विभाग, नगर परिषद, कृषि विभाग, पंचायत समिती, भूमि अभिलेख, आरोग्य विभाग, महीला बालकल्याण, पशुसंवर्धन, सहकार, विज वितरण विभाग, बी एस एन एल , एस टी इत्यादी विवीध विभागांकडील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना द्यावयाच्या लाभा बाबत देखिल कामकाज करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार सचिन पाटील यांनी सांगितले.

सदर मेळाव्यास जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी, नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांनी केले.

# पत्रकारांनी निर्भीडपणे पुढे येण्याची गरज - भीमराव आंबेडकर

## अकलूज येथे मूकनायक परिसंवाद कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकलूज : प्रतिनिधी**

मूकनायकमुळे अबोल असलेली माणसे बोलू लागली साहित्य निर्मितीला अंकुर फुटले. आज पत्रकारीतेचे अंग कुठेतरी कमी पडताना दिसत आहे. यासाठी व्यवस्थेला हादरे देण्यासाठी पत्रकारांनी पुढे येण्याची गरज आहे, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भीमराव आंबेडकर यांनी व्यक्त केले.

अकलूज येथे मूकनायक परिसंवाद कृती समितीच्या वतीने दि ४ फेब्रुवारी रोजी मूकनायक या वृत्तपत्राच्या १०३ व्या वर्धापन दिनानिमित्त मूकनायक परिसंवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी अभ्यासक विचारवंत सत्येंद्र चव्हाण, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य धैर्यशील मोहिते पाटील, भंते बी सारीपुत्त आदिसह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी,कार्यकर्ते, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले.



यावेळी धैर्यशील मोहिते पाटील बोलताना म्हणाले की, अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये मूकनायकची निर्मिती करून डॉक्टर आंबेडकरांनी लोकांना बोलते केले लोकांच्या व्यथा त्यांनी मांडल्या.त्यामुळे शोषित पिडीताना न्याय मिळाला.

यावेळी व्याख्याते डॉक्टर सत्येंद्र चव्हाण यांनी आपल्या ओघवत्या भाषेतून इतिहासाचा परामर्श घेत अनेक संदर्भ देत छत्रपती शिवाजी महाराज ,छत्रपती संभाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,भीमा कोरेगाव आदी विषयांचा उलगडा केला. महारांचा लष्करी व सांस्कृतिक इतिहास याबाबतचे त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

परिसंवादात मान्यवरांच्या हस्ते राजू लोहकरे व अशोक कांबळे यांना पत्रकारितेतील आदर्श पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सदर कार्यक्रमास्थळी डॉं.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) या शासकीय संस्थेकडून पुस्तकाचा स्टॉल उभारण्यात आला होता त्याचबरोबर खाजगी पुस्तके ही या ठिकाणी विक्रीसाठी उपलब्ध होती यावेळी जवळपास १ लाख ७७ हजार रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली. या ठिकाणी भरवण्यात आलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या दुर्मिळ छायाचित्रांना लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मूकनायक कृती समितीचे नागेश लोंढे, आनंदकुमार लोंढे, बाळासाहेब गायकवाड, डी एस गायकवाड ,गौतम भंडारे,सागर खरात, कैलास कांबळे,सुजित सातपुते त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

सदर मूकनायक परिसंवाद या कार्यक्रमास परजिल्ह्यातील लोकांची उपस्थिती देखील पहावयास मिळत होती.

# अकलूजमध्ये १६ फेब्रुवारी रोजी आक्रोश मोर्चाचे आयोजन

**अकलूज : प्रतिनिधी**

अनुसूचित जाती जमातीमध्ये सध्या होत असलेली जात चोरांची घुसखोरी थांबली पाहिजे, या प्रमुख मागणीसाठी व इतर हक्कांच्या मागण्यांसाठी अकलूजमध्ये दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १० वाजता भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ आंबेडकर चौक प्रांत अधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती अनुसूचित जाती जमाती बचाव समितीचे सुधीर साठे यांनी शासकीय विश्राम गृह येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी संजय गोरवे, लालासाहेब अडगळे, संदीप खंडागळे, शेखर खिलारे, सागर लोखंडे, सज्जन लोखंडे, दीपक दशरथ खंडागळे, विकी खंडागळे, समाधान आवारे आदी उपस्थित होते. यावेळी माहिती देताना सुधीर साठे म्हणाले की, माळशिरस तालुक्यात उत्तम जानकर यांनी हिंदु खाटीक दाखला काढला. त्यानतंर त्यांची मुले जीवन जानकर व ज्योती जानकर यांनीही काढला. ही अनुसूचित जातीमध्ये घुसखोरी आहे. आणि ती थांबली पाहिजे म्हणून त्यांनी काढलेल्या दाखल्यांच्या विरोधात १६ फेब्रुवारी रोजी अकलूज मधून भव्य जनआक्रोश मोर्चा अनुसूचित जाती जमाती बचाव समितीचे वतीने काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अनुसूचित जाती जमाती बचाव समितीचे संजय गोरवे, संदीप खंडागळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तर सर्वांनी या मोचार्साठ मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचं आवाहन अनुसूचित जाती जमात बचाव समितीने केली आहे.

## खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

एकाच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी एकावर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक ३१ जानेवारी रोजी पावणे बारा वाजण्याच्या सुमारास मायणी, ता. खटाव गावच्या हद्दीत असलेल्या मायणी एसटी स्टँड येथील पाणी पिण्याच्या टाकीजवळ जुन्या भांडणाचा राग मनात धरून सनेल शिवाजी मदने रा. मायणी, ता. खटाव याने तेथीलच अक्षय सोपान जाधव यांना बर्फ फोडण्याचा टोचा मारुन गंभीर मारहाण केली.

याप्रकरणी मध्ये यांच्यावर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक पालेकर करीत आहेत.

# जावळीत दहापेक्षा अधिक दारू विक्रीचे गुन्हे दाखल झालेल्यांवर मोका की मोक्का?

- **तालुक्यात पोलिसांची बुचकळ्यात टाकणारी भूमिका दारूसम्राट यांना तडीपार व मोक्का कधी लावणारढ? पालकमंत्र्यांकडे मागणी**

**कुडाळ : प्रतिनिधी**

जावळी तालुक्यात आजही खुलेआम गुटखा विक्री मटका दारू जुगार सुरू असून किरकोळ कारवाया केल्या जात आहेत प्रारंभीच जावळीचे नूतन पोलीस अधिकारी संतोष तासगावकर यांनी आल्या आल्या जावळी तालुक्यात दारू विक्रीवर जोरदार कारवाईचा धडाका लावला दहा लाखाचा दारू मुद्देमाल जप्त देखील केला मात्र त्यानंतर अवैद्य दारू विक्रीवरच्या कारवाया संत झाल्या सातारा जिल्हा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी अवैध धंदे करणाऱ्यांना मोका लावणार असल्याचे सुतवाच केले आता जावळी तालुक्यात असे अनेक दारू व्यवसायिक आहेत की ज्यांच्यावर किमान दहापेक्षा जास्त अधिक गुन्हे दाखल झाले आहेत अशा व्यक्तींवर आता पालकमंत्र्यांच्या आदेशावरून मोका अथवा तडीपरीच्या कारवाया कधी केला जाणार असा सवाल देखील आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ लागला आहे.

जावळी तालुक्यात कुडाळ मेढा केळघर करहर सायगाव आनेवाडी सोनगाव या गावात मोठ्या प्रमाणात दारूची अवैध विक्री केली जात आहे जागोजागी दारूचे अड्डे पहावयास मिळत आहे जावळी तालुक्यात या गावात सहजासहजी हाकेच्या अंतरावर कुठेही गेला तरी दारू सहज मिळते मोबाईलवर ऑनलाइन सर्वत्र १५० रुपयापासून पंधरा हजार रुपया पर्यंतच्या दारूच्या बाटल्या सहज मिळून जातात एवढेच नव्हे मटका खेळणाऱ्यांना व जुगार खेळणाऱ्यांना देखील ऑनलाइन जुगाराची व मटक्याची सोय या व्यवसायिकांनी करून दिली आहे तालुक्यात अवैद्य व्यवसायिकांनी आपणाला पोलिसांच्या कारवाईसमोर जायची वेळ येणार नाही यासाठी वेगवेगळ्या नामी शक्कल लढवल्या जात आहेत ऐतिहासिक जावळी तालुक्याला डागळणाऱ्या अनेक घटना घडत आहेत यात अनेक अवैध दारू मटका जुगाराच्या गुन्हेगारी घटना व युवा पिढीला बरबाद करण्याच्या घटना सध्या जोर धरू लागल्या आहेत यावर सातारा जिल्ह्याचे थेट पालकमंत्र्यांनी भाष्य केल्याने सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक आता अवैध धंदे बंद करण्यासाठी धडाका सुरू करतील जावळ तालुक्यात विशेष लक्ष देतील अशी अपेक्षा तालुक्यातल्या जनतेतून व्यक्त होऊ लागली आहे यावर कुडाळ परिसरात सोनगाव केळघर प्रति पंढरपूर करहर या गावात तर अवैध दारू विक्रीचा महापूर वाहत आहे.

जावळी तालुक्यातल्या महिलांनी मतदानाद्वारे उभी बाटली आडवी केली मात्र या रणरागिनी महिलांच्या उद्देशाला हरताळ फासण्याचे काम संबंधित प्रशासकीय यंत्रणा सह अवैध दारू धंदेवाले करत आहे काय उपयोग झाला त्या मोहिमेचा त्या यंत्रणेचा त्या लढ्याचा त्यामुळे तालुक्यातल्या आया बहिणींच्या कपाळावरील कुंकू शाबूत ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख यांनी जावळी तालुक्यातल्या अवैध धंद्यांवर विशेष लक्ष टाकावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल

**सातारा : प्रतिनिधी**

विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी तिघांवर बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १० ऑगस्ट २०२२ ते २६ ऑक्टोबर २०२२ दरम्यान ऐश्वर्या रणजीत जाधव या विवाहितेचा जाचहाट केल्याप्रकरणी पती रणजीत राजेंद्र जाधव, सासरे राजेंद्र गणपत जाधव आणि सासू संगीता राजेंद्र जाधव सर्व रा. वडूज, तालुका खटाव यांच्यावर बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार महाडिक करीत आहेत.

# समर्थ सदन सांस्कृतिक केंद्रात सामुदायिक दासबोध पारायण सोहळ्यास सुरुवात

**सातारा : प्रतिनिधी**

श्री समर्थ सेवा मंडळाच्या वतीने सातारा शहरातील राजवाडा परिसरातील पंचपाळे हौदानजीकच्या श्री समर्थ सांस्कृतिक केंद्र, समर्थ सदन येथे दासनवमी महोत्सवानिमित्त सामुदायिक दासबोध ग्रंथ वाचन पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला आहे. हे दासबोध वाचन समर्थ भक्त बाळू बुवा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून माघ वद्य प्रतिपदा अर्थात गुरु प्रतिपदेला या दासबोध पारायण सोहळ्यास शेकडो समर्थ भक्तांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला .यानिमित्त समर्थ सदन येथील समर्थांचे मूर्ती विशेष पूजा करण्यात आली होती .तसेच समर्थ सदन चा परिसर आकर्षकपणे सजवण्यात आला आहे. कीर्तन करणाऱ्या रामभक्त हनुमानाच्या प्रतिमेपुढे व्यासपीठावर बसून हा दासबोध ग्रंथ वाचन सोहळा सुरू झाला.



**सातारा येथील समर्थ सदन सांस्कृतिक केंद्रात दासनवमी उत्सवानिमित्त समर्थ रामदास स्वामींच्या मूर्तीची केलेली विशेष पूजा तसेच सामुदायिक दासबोध ग्रंथाचे पारायण प्रसंगी दासबोध वाचन करताना समर्थ भक्त बाळू बुवा कुलकर्णी व पारायणासाठी उपस्थित असलेले समर्थ भक्त. (छाया : अतुल देशपांडे)**

दररोज सकाळी मनाचे श्लोक, दासबोध ग्रंथातील समास व दशकांचे वाचन त्यानंतर दासबोध ग्रंथाची आरती व प्रसाद वितरण असा कार्यक्रम संपन्न होणार आहे .येत्या दास नवमी पर्यंत १५ फेब्रुवारी पर्यंत हे सामुदायिक पारायण सुरू असून या पारायण सोहळ्यात समर्थ भक्त रमेशबुवा शेंबेकर ,सौ .जयश्री कुलकर्णी, श्री .प्रकाश खरे यांचे सह अनेक मान्यवर समर्थ भक्त उपस्थित आहेत.

या दासबोध पारायणाच्या संयोजनासाठी समर्थ सेवा मंडळाचे व्यवस्थापक प्रवीण कुलकर्णी ,राजू उर्फ मुरलीधर कुलकर्णी ,सौ .कल्पना ताडे ,रवी बुवा आचार्य ,सौ .देसाई वहिनी, राजाभाऊ कुलकर्णी हे समर्थ भक्त विशेष परिश्रम घेत आहेत. दासबोध वाचनासाठी सातारा शहर व परिसरातील महिला समर्थ भक्तांची विशेष लक्षणीय उपस्थिती असून यानिमित्त समर्थ सदन येथे सायंकाळी १५ फेब्रुवारी पर्यंत विविध मान्यवरांची प्रवचने व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून दासनवमी उत्सवातील या विविध कार्यक्रमांना सातारा जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन समर्थ सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## किरकोळ कारणावरून एकाला मारहाण

**सातारा :** किरकोळ कारणावरून एकाला मारहाण केल्याप्रकरणी हॉटेल मालकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरातील दौलत नगर येथील शानबाग शाळेच्या समोर असलेल्या जगदंबा हॉटेलचे मालक ओंकार किर्दत रा. करंजे, सातारा यांनी दिनांक १९ जानेवारी रोजी साडेदहा वाजण्याच्या सुमारास अजित जगन्नाथ पाटील यांना किरकोळ कारणावरून वाद करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ केली.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# आदित्य ठाकरे यांचे मुख्यमंत्र्यांना आव्हान देणे हास्यास्पद

## पालकमंत्री शंभूराज देसाई यांची आदित्य ठाकरे यांच्यावर टीका



**सातारा : प्रतिनिधी**

ज्यांच्या मागे ५० आमदार व तेरा खासदार आहेत त्यांना कोणीही उठावे आणि आव्हानं देण्याची भाषा करावी माजी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वरळी मतदारसंघातून निवडून येण्याचे दिलेले आव्हान हे केवळ हास्यास्पद आहे. त्यांची खूपच तयारी असेल तर त्यांनी पाटण मतदारसंघातून येऊन निवडून दाखवावे, असे खुले आव्हान आमदार शंभूराजे यांनी दिले.

साताऱ्यात शंभूराजे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक रित्या बोलताना आव्हान प्रति आव्हानाच्या संदर्भातील आपली भूमिका स्पष्ट केली माजी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मी वरळी मतदारसंघाचा राजीनामा देतो तेथून त्यांनी माझ्या विरोधात निवडणूक लढवावी असे आव्हान दिले होते या आदित्य ठाकरे यांच्या विधानाचा राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजेसाई यांनी साताऱ्यात चांगलाच समाचार घेतला.

ते पुढे म्हणाले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीमागे तेरा खासदार आणि पन्नास आमदारांचे पाठबळ आहे या पाठबळावरच बाळासाहेबांची शिवसेना दमदारपणे सत्तेमध्ये वाटचाल करत आहे आदित्य ठाकरे यांनी निवडणूक लढवण्याचे दिलेले आव्हान हे केवळ हास्यास्पद आहे आदित्य ठाकरे यांना निवडून आणण्यासाठी शिवसेनेला दोन आमदारच्या विधान परिषदेवर निवडून द्यावे लागले शिंदे साहेब लांब राहू देत आम्ही कार्यकर्ते आहोत त्यांचा समाचार घ्यायला पुन्हा निवडणूक त्यांना जर लढवायची असेल तर त्यांनी पाटण मध्ये येऊन विधानसभेची निवडणूक लढवून दाखवावी आदित्य ठाकरे सातत्याने टीका करत असतात त्यांनी टीका करताना राजकीय विधानांचे भान ठेवावे त्यांच्या आमदारकीसाठी आमदार सुनील शिंदे यांचे तिकीट कट करावे लागले सुनील शिंदे व सचिन अहिर यांना विधान परिषदेवर घ्यावे लागले त्यामुळे आपण काय बोलतो आहोत याचा विचार करूनच त्यांनी विधाने करावीत अशी जोरदार टीका शंभूराज देसाई यांनी केली.

# आर्थिक फसवणूक प्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

आर्थिक फसवणूक प्रकरणी चौघा परप्रांतीयांवर कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक २ जून २०२२ पासून सतीश नारायण चव्हाण राहणार एकंबे तालुका कोरेगाव यांना ऊसगाव हंगामासाठी २४ ऊसतोड मजूर पुरवण्याचे आश्वासन देऊन आणि त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने पाच लाख सात हजार रुपये आणि मोबाईल हँडसेट घेऊन त्यांना ऊस तोडणी मजूर न पुरवता व त्या पोटी घेतलेले पैसे परत न करता त्यांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी डेबा तेरसिंग चौहान, जगदीश दुडबे दोघेही रा. मोहन पाडवा जिल्हा बलवाडी मध्य प्रदेश, जुबानसिंग परमासिया राहणार झिरपण, राजेश ओलावे राहणार शेंदवा जिल्हा बडवानी या चौघांवर कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंदे करीत आहेत.

# श्री नटराज मंदिरातील भागवत कथा सप्ताहाला मोठ्या उत्साहात प्रारंभ

**सातारा : प्रतिनिधी**

येथील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिरात श्री नटराज महिला मंडळाचे वतीने दिनांक ३ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा सप्ताह सोहळ्याला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.

डोंबिवली येथील हरिभक्त परायण प्रवचनकार निलेश महाराज यांच्या उपस्थितीत या भागवत सप्ताहाचे उद्घाटन दीप प्रज्वलन करून झाले. याप्रसंगी नटराज मंदिराचे व्यवस्थापकीय विश्वस्त रमेश शानभाग ,सौ.उषा शानभाग तसेच मंदिराचे सर्व कार्यक्रमात विशेष सहभाग घेणारे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री व सौ. शहाणे यांनी निलेश महाराज यांचे यथोचित स्वागत केले .त्यानंतर विविध प्रकारच्या विविधरंगी आकर्षक पणे सजविलेल्या मंडपामध्ये निलेश महाराजांनी भागवत कथा सांगण्यास सुरुवात केली. मंदिराचे वतीने श्री शहाणे यांनी निलेश यांचा पुष्पहार तसेच नटराज प्रसाद देऊन सत्कार केला.



**सातारा येथील श्री उत्तरने चिदंबरम नटराज मंदिरात श्रीमद् भागवत कथा सप्ताहात भागवत कथा सांगता निलेश महाराज. (छाया : अतुल देशपांडे)**

प्रवचनकार निलेश यांचे समावेत श्री. सुमित त्यांना गायन व वादन साठी सहसाथ करत आहेत. या कार्यक्रमास दररोज सातारकर यांची गर्दी वाढतच असून या संपूर्ण सप्ताह सोहळ्याचे आयोजनासाठी शुभांगी ऊरणे ,रमेश हलगेकर ,सुशीला बाचणकर ज्योती टंकसाळे तसेच नटराज महिला मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या विशेष परिश्रम घेत आहेत.

हा सर्व कथा सप्ताह सोहळा उपस्थित तसेच सर्व सातारकरांसाठी विनामूल्य असून या धार्मिक ग्रंथाच्या कथानरूप गोष्टींचे श्रवण करण्यासाठी सातारकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे तसेच या कार्यासाठी तन-मन-धन अर्पण सहकार्य करावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# अनुवादित साहित्यामुळे वाचकांचे अनुभव विश्व समृद्ध

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नीला जोशी यांचे प्रतिपादन

**सातारा : प्रतिनिधी**

भाषेमधून देशाच्या संस्कृतीचेही दर्शन घडते अनुवादित साहित्य आणि भाषेचे सौंदर्य वाढले आहे व मराठी भाषा अधिक समृद्ध झाली आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ अनुवादित साहित्याच्या अभ्यासक डॉक्टर नीला जोशी यांनी केले.




कला वाणिज्य महाविद्यालय सातारा येथे कला वाणिज्य महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भिन्न भाषिक साहित्याची मराठी भाषांतरे या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या मंचावर शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉक्टर प्रकाश दुकळे, मराठी विभाग प्रमुख डॉक्टर नंदकुमार मोरे, सातारा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे चेअरमन जयेंद्र चव्हाण शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग प्रमुख डॉक्टर मेघा पानसरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर दिलीप गायकवाड हे उपस्थित होते.

डॉक्टर नीला जोशी पुढे म्हणाल्या मराठी साहित्यसमृद्ध करण्यामध्ये अनुवादित साहित्य लेखनाचे योगदान मोठे आहे . आजवर अनेक चांगल्या मराठी साहित्याचे जगातील विविध भाषांमध्ये भाषांतर झाले आहे जगातील इतर अनेक भाषातील साहित्याचा मराठी अनुवाद झालेला आहे त्यामुळे मराठी अधिक समृद्ध झाले आहे.

बीजभाषक म्हणून बोलताना डॉक्टर मेघा पानसरे म्हणाल्या अनुवादित साहित्यामुळे जगभरातील साहित्य भारतातील विविध भाषेमध्ये लोकांपर्यंत पोहोचले आहे भारतीय साहित्याच्या जगातील इतर विविध भाषातील अनुवादामुळे भारतीय साहित्याच्या घरात पोहोचले आहे.

संस्थेचे चेअरमन व चर्चासत्राचे उद्घाटक जयेंद्र चव्हाण म्हणाले अनुवादित साहित्यामुळे शिक्षित युवा वर्गासाठी रोजगाराची अनेक दालने खुली झाली आहेत त्यामुळे अनेक महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये विदेशी भाषांच्या अभ्यासक्रम सुरू झाले आहेत यासाठी तरुणांनी विविध भाषेचे ज्ञान आत्मसात करायला हवे.

प्राचार्य दिलीप गायकवाड म्हणाले भाषा ही संवादाचे माध्यम आहे योग्य शब्दांच्या वापरामुळे भाषा सुमधुरून श्रवणीय बनते जगात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे जग जवळ येत आहे भाषेला सीमांचे बंधन नसते भाषेमधून देशाच्या संस्कृतीचे दर्शन घडते अनुवादित साहित्य आणि भाषेचे सौंदर्य वाढले आहे.

मराठी शिक्षण संघाच्या संशोधन पत्रिकेचे प्रकाशन यावेळी करण्यात आले भाषा विषयात विशेष योगदान देणारे शिक्षक विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला उद्घाटनानंतर चर्चासत्रामध्ये डॉक्टर सुप्रिया वकील डॉक्टर जयश्री जोशी डॉक्टर उमा कुलकर्णी यांनी साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले चर्चा सत्राच्या पहिल्या दिवशी सत्र समाप्तीनंतर कविता वाचनाचा कार्यक्रम झाला यावेळी डॉक्टर लता माळी व मान्यवरांनी आपल्या कविता सादर केल्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉक्टर दिलीप गायकवाड यांनी केले डॉक्टर अनिल गवळी डॉक्टर दीपा बोरकर डॉक्टर सुनील सावंत डॉक्टर रमेश साळुंखे डॉक्टर सुप्रिया सहस्त्रबुद्धे डॉक्टर संजय देशपांडे व महाविद्यालयीन भाषा विषयाचे प्राध्यापक संशोधक समीक्षक वाचक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते चर्चा क्षेत्राचे समन्वयक डॉक्टर भरत जाधव यांनी आभार मानले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर तातोबा बदामी यांनी केले.

# सज्जनगडावर ३४१ वा दासनवमी उत्सव सुरू

## श्रीराम पंचायतन मूर्तींना उद्वार्चन पूजा व अभिषेक

**सातारा : प्रतिनिधी**



श्री क्षेत्र सज्जनगड (ता. सातारा) येथील श्री रामदास स्वामी संस्थान तर्फे ३४१ वा दासनवमी महोत्सव सोमवार दिनांक ६ फेब्रुवारी ते गुरुवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे .

राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्याने पुनित झालेल्या सज्जनगड क्षेत्रावर त्यांचा हा पुण्यतिथी सोहळा यावर्षी मोठ्या उत्साहात श्री समर्थ समाधी समोर अनेक मान्यवरांचे कीर्तन भजन-प्रवचन- गायन आधी सेवारुपी कार्यक्रमाने संपन्न होणार आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये तन-मन-धनाने सहभागी होऊन समर्थ सेवेचे श्रेय संपादन करावे तसेच समर्थ दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थांचे अध्यक्ष व अधिकारी स्वामी श्री दुर्गाप्रसाद स्वामी यांनी केले आहे. हा सर्व पुण्यतिथी महोत्सव सर्व समर्थ भक्तांना संस्थांच्या फेसबुक पेज तसेच संस्थांच्या युट्युब चॅनेल द्वारे सुद्धा घरबसल्या श्री समर्थ दर्शनाचा लाभ घेता येणार आहे, अशी ही माहिती त्यांनी दिली.

दरम्यान या उत्सवानिमित्त आज रविवारी सकाळी संस्थांचे अध्यक्ष दुर्गाप्रसाद स्वामी यांच्या हस्ते मंदिरातील श्रीराम पंचायतन मूर्तींना उद्वार्चन पूजा व अभिषेक करण्यात आला. महोत्सवात माघ वद्य प्रतिपदा सोमवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत संस्थांचे अध्यक्ष श्री दुर्गाप्रसाद स्वामी यांचे प्रवचन त्यानंतर सकाळी साडेदहा वाजता सज्जनगडावरील अशोक वन या ठिकाणी भक्तांच्या भोजन प्रसादासाठी केलेल्या सुविधांचा लोकार्पण सोहळा राज्याचे संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत दादा पाटील तसेच प्रसिद्ध उद्योजक फारोख कूपर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे. दुपारी ३ वाजता प्रमोद गायकवाड यांचे सनई वादन त्यानंतर ४ वाजता संजय गरुड पुणे यांचे गायन व रात्री ९ वाजता कौस्तुभ बुवा रामदासी मिरज यांचे कीर्तन होणार आहे .मंगळवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते ९ या वेळेत पुणे येथील समर्थ भक्त मीना नाथ अंबिके यांचे प्रवचन ,दुपारी २ ते ३ या वेळेत सानिया पाटणकर यांचे गायन दुपारी ३ते ४ गीतामाई भजनी मंडळ सातारा यांचे भजन , ४वाजता कृतिका पळशीकर पुणे यांचे गायन व रात्री ९ वाजता प्रतीक बुवा कोठावळे यांचे कीर्तन होणार आहे .

# कातवडी येथील पाणी पुरवठा योजनेतील कामाचे भूमिपूजन

■ **पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते संपन्न**



**सातारा : प्रतिनिधी**

कातवडी (मेष्टेवाडी) येथील जलजीवन मिशन सन २०२१-२२ अंतर्गत नवीन पाणी पुरवठा योजनेतील कामाचे भूमिपूजन उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते संपन्न झाले.

मेष्टेवाडीच्या ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या नवीन पाणी पुरवठा योजनेमुळे सुटेल याचा आनंद आहे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच मतदारसंघातील विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असा विश्वास शंभूराज देसाई यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

यावेळी केरा विभागातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शैक्षणिक प्रश्नांवर अभिषेक काळेंचे शरद पवारांना पत्र

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर तालुक्यात उच्च शिक्षणासाठी कॉलेजची उपलब्धता नसल्यामुळेच विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी महाबळेश्वर सोडून बाहेर गावी जाव लागत आहे, अशा परिस्थितीत आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची फरफट होत आहे. या प्रश्नावर आवाज उठवत महाबळेश्वरचे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस चे नेते अभिषेक काळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस चे सर्वेसर्वा शरद पवार यांना पत्र लिहीत या समस्येवर उपाय काढण्याची विनंती केली आहे.

या कार्यात त्यांना राष्ट्रवादीचे श्रीकांत पारठे यांचे मार्गदर्शन व शिवसैनिक यश मोरे यांचे सहकार्य लाभले.

# ...तर रासप लवकरच मोठा पक्ष बनेल : आ. महादेव जानकर

**वडूज : प्रतिनिधी**

आज अखेर राष्ट्रीय समाज पक्ष हा सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांना मोलाची संधी देत आला आहे. आपल्या पक्षात कार्यकर्ते मोठे नेते होतात आणि क्षणभंगुर स्वार्थासाठी दुसऱ्या पक्षात जाऊन पुन्हा विझून जातात.मी हा पक्ष स्थापन केला तेव्हा अनेकांनी कुचेष्टा केली, पण मी मनावर न घेता लढत राहिलो, आजच्या मितीला राष्ट्रीय समाज पक्ष हा चार राज्यात मोठा पक्ष म्हणून कार्यरत असून येत्या काही दिवसांत अजून दोन मोठ्या राज्यात यशस्वी घोडदौड करेल. पक्षाला सर्वत्र जनतेचा भरभरून प्रतिसाद मिळतोय.माझं होम पीच असलेल्या सातारा जिल्ह्यात मात्र ही परिस्थिती बदलावी लागेल, कारण होमपीच वर पक्ष मजबुत झाला तर राष्ट्रीय स्तरावर मला अधिक बळ मिळेल, त्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पक्ष वाढवावा असं आवाहन राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री आ महादेवराव जानकर यांनी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या आयोजित बैठकीत केलं.




वडूज ता खटाव येथे झालेल्या राष्ट्रीय समाज पक्षाच्या प्रमुख पदाधिकारी बैठकीत आमदार महादेव जानकर बोलत होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष काशिनाथ शेवते, महासचिव ज्ञानेश्वर सरगर, उपाध्यक्ष बबन दादा विरकर, सिने आघाडी प्रदेश उपाध्यक्ष डॉ विनोद खाडे, रासप नेते मामू शेठ विरकर, खंडेराव सरक,जिल्हा अध्यक्ष श्रीकांत देवकर, पूजाताई घाडगे, उमेश चव्हाण, दादासाहेब दोरगे, विलास चव्हाण,डॉ रमाकांत साठे, आकाश विरकर, नितीन कटरे, सुरेखाताई काळेल, दत्ता खांडेकर, निलेश लांडगे, अतुल पवार,संदीप बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आगामी लोकसभा,विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी पक्ष तयारी करतोय.त्याच बरोबर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणामध्ये आपल्या पक्षाची ताकद निश्चितच वाढविली पाहिजे. वकील, डॉक्टर, अधिकारी यांच्यापर्यंत पक्ष पोहोचवला पाहिजे असेही आ जानकर यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष काशिनाथनाना शेवते,बबनराव वीरकर, मामुशेठ वीरकर आदींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास खटाव सह माण तालुक्यातील रासप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्थेच्या फेडरेशन सदस्यपदी नितीन दोशी

## माणदेशीच्या वतीने दोशींचा सत्कार

**म्हसवड : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात उत्तुंग भरारी घेत ऑडीटमध्ये अ वर्गाचे सातत्याने नामांकन मिळवत माणच्या शिरपेचात नवा झेंडा फडकावण्याचे काम करणाऱ्या व म्हसवड येथील सामान्य वर्गाची अर्थवाहिनी ठरलेल्या अहिंसा नागरी पतसंस्थेचे प्रमुख, माजी नगराध्यक्ष नितीन दोशी यांची महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या निमंत्रित सदस्यपदी निवड झाल्याबद्दल म्हसवड येथील माणदेशी फौंडेशनच्या सर्वे सर्व्हा श्रीमती चेतना सिन्हा यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना चेतना सिन्हा म्हणाल्या की महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था ही राज्यातील सहकार चळवळ समृद्ध करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते पतसंस्थाची ती आधार आहे अशा राज्य पातळीवरील फेडरेशनच्या संचालक मंडळावर काम करण्याची संधी नितिनभाई दोशी यांना मिळाली ही फार मोठी बाब आहे. या माध्यमातून सहकारात चांगले काम होईल याची मला खात्री आहे.



माण तालुक्यातील सामान्य महिलावर्गासाठी तर सामान्य नागरीकांसाठी माणदेशी महिला बँक व अहिंसा नागरी पतसंस्था ह्या नेहमीच अग्रस्थानी राहिल्या आहेत, माण तालुक्यातील महिलांसाठी ज्याप्रमाणे माणदेशी बँक कार्यरत आहे त्याप्रमाणे म्हसवड शहरातील सामान्य वर्गाच्या पाठीशी आपणही ठामपणे उभे राहुन त्यांना आर्थिक पाटबळ द्यावे ही साधी संकल्पना समोर ठेवुन वाटचाल करणार्या येथील अहिंसा पतसंस्थेने आजवर अनेकांना मोठा आधार दिला आहे, राजकारणात सक्रीय राहुनही राजकिय जोडे पतसंस्थेबाहेर सोडुन दोशी हे कार्यरत असल्याने आजवर सदर संस्थेने विविध मानांकन प्राप्त केले आहेत, पारदर्शी कारभार व अ वर्ग मानांकनामुळे पतसंस्थेच्या चेअरमनला फेडरेशन च्या संचालक मंडळामध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. असे ही शेवटी श्रीमती सिन्हा म्हणाल्या.

**महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या निमंत्रित सदस्यपदी अहिंसा पतसंस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष नितिन दोशी यांना सदर निवडीचे पत्र फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते देण्यात आले.**

महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या निमंत्रित सदस्यपदी अहिंसा पतसंस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष नितिन दोशी यांना सदर निवडीचे पत्र फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते देण्यात आले.

नितिन दोशी यावेळी म्हणाले मला जी संधी मिळाली आहे त्याचा उपयोग पतसंस्था चळवळ समृद्ध करण्याचा प्रयत्न करीन माझा माणदेशीने केलेला सत्कार हा माझ्या परिवारातील सत्कार आहे.

यावेळी माण देशी फौंडेशन व बँकेचा स्टाफ उपस्थित होता.

# जलसंधारण विभागाच्या गैर प्रक्रियेविरोधात जनहित याचिका सादर

## सामाजिक कार्यकर्ते सुशांत मोरे यांची माहिती

**सातारा : प्रतिनिधी**

मृदा व जलसंधारण विभागाच्या ६ हजार १९१ कोटी रुपयांच्या कामाच्या गैरप्रक्रिये विरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका सादर करण्यात आल्याची माहिती दिशा विकास मंचचे अध्यक्ष सुशांत मोरे यांनी दिली .बनावट दस्तऐवज करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या जलसंधारण महामंडळाकडील ६१९१ कोटी रुपयांची मंजूर कामे रद्द करण्यात आली होती. ही कामे करण्यासाठी चुकीची प्रक्रिया दाखवून शासकीय आदेश धाब्यावर बसवण्यात आला. त्यासाठी नवीन अध्यादेश काढून मेलेला माणूस जिवंत करण्याचा प्रकार सरकारकडून करण्यात येत होता. या साऱ्या प्रक्रियेला साताऱ्यावरून सुशांत मोरे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते . त्यासाठी जनहित याचिका सादर करण्यात आली असून या संदर्भात लवकरच सुनावणी होणार असल्याचे सुशांत मोरे यांनी सांगितले आहे.

ज्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात बनावट दस्तऐवज तयार करून तडजोडी केल्या आहेत त्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू झाल्याचे ही सांगण्यात आले. ८ जुलै २०२२ रोजी जलसंधारण महामंडळाकडील प्रत्यक्ष सुरुवात न झालेल्या कामांच्या सर्व स्तरातील निविदा रद्द करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्यपाल यांनी दिले होते.

व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र जलसंधारण विभाग महामंडळाचे सु पा कुशिरे, प्रधान सचिव एकनाथ डवले, राज्याचे मुख्य सचिव मनू कुमार श्रीवास्तव यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यापूर्वीच करण्यात आली आहे. ही प्रक्रिया सुरू करण्यात आल्याचे मोरे यांनी सांगितले.

# तुर्कस्तान की भूकंपस्थान...



## गेल्या २४ तासात तुर्कीला भूकंपाचे तब्बल ३९ धक्के, १७०० हून अधिक मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लागोपाठ झालेल्या भूकंपाच्या दोन मोठ्या धक्क्यांनंतरही तुर्कीमध्ये भूकंपाचे धक्के बसणं सुरूच आहे. गेल्या २४ तासात या देशात भूकंपाचे तब्बल ३९ धक्के बसले असून आतापर्यंत १७०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. तुर्कीमध्ये पहाटे ४ वाजून १७ मिनिटांनी पहिला भूकंपाचा धक्का जाणवला. त्यानंतर दुपारी १ वाजून २४ मिनीटांनी दुसरा धक्का बसला. आतापर्यंत सात हजाराहून अधिक लोक जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरुच आहेत.

एक मोठा भूकंप झाल्यानंतर त्यानंतर इतर काही लहान-लहान भूकंपांची मालिका सुरू होते. तुर्कीमध्येही पहाटे ७.८ रिश्टर स्केलचा भूकंप झाला, त्याची डेप्ट ही १८ किमीची होती. त्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली. गाझियनटेप हे भूकंपस्थानापासून सीरिया हा देशही जवळ आहे. त्यामुळे या भूकंपाची तीव्रता तुर्की आणि सीरियामध्ये जाणवली असून त्यामध्ये आतापर्यंत १४०० हून अधिक लोकांना जीव गमवावा लागला आहे.

तुर्कीमध्ये भूकंपाचे धक्के जाणवत असताना त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य सुरू झालं आहे. एपी या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, तुर्कीसह सीरियामध्ये शेकडो इमारती जमीनदोस्त झाल्यामुळे मोठं नुकसान झालं आहे. या भूकंपाचा फटका सर्वच प्रमुख शहरांना बसल्यामुळे जनजीवनही विस्कळीत झालं आहे. अजूनही अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची भीती आहे. त्यामुळे बचाव आणि मदतकार्य मोठ्या प्रमाणावर चालवले जात आहे.

भूकंपाच्या पार्श्वभूमीवर तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष एर्दोगन यांनी तातडीची बैठक घेतली, त्यामध्ये भूकंपग्रस्तांना शक्य ती सर्व मदत देण्याचे आदेश दिले आहेत. अनेक देश आपत्तीग्रस्त तुर्कीला मदत करणार आहेत. या देशांमध्ये भारताचाही समावेश आहे.

युरोपातील एका शास्त्रज्ञाने या भूकंपाचा अंदाज तीन दिवसांपूर्वी वर्तवला असल्याची माहिती आहे. नेदरलँडचे शास्त्रज्ञ फ्रँक हॉगरबिट्स यांनी ३ फेब्रुवारीला याबाबत ट्वीट केले होते. ते म्हणाले होते की आज नाही तर उद्या, पण लवकरच या भागात ७.५ रिश्टर स्केलचा भूकंप येणार आहे. शास्त्रज्ञ फ्रँक हॉगरबाइट्स यांनी केलेल्या ट्विटमध्ये ७.५ तीव्रतेचा भूकंप दक्षिण-मध्य तुर्की, जॉर्डन, सीरिया आणि लेबनॉनला प्रभावित करेल असं म्हटलं आहे.

भूकंपाच्या दरम्यान तुर्कस्तानच्या अनेक भागात तापमान शून्याच्या खाली नोंदवण्यात आले आहे. सध्या देशात कडाक्याची थंडी पडत आहे. भूकंपामुळे येथील विमानतळाच्या धावपट्टीचे नुकसान झालं आहे. बर्फवृष्टीमुळे बचाव कार्यातही अडचण निर्माण झाली आहे.

# 'घरात नाही दाणा, पण मला कैवारी म्हणा'

## देशात दुर्भिक्ष्य पण पाक लष्कराला पडली काश्मिरची उठाठेव



**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानात अभूतपूर्व दुर्भिक्ष्य सोसण्याची वेळ आलेली असतानाही पाक लष्कराची काश्मिरात तोंड खुपसण्याची खुमखुमी गेलेली नाही. भारताने काश्मीर जबरदस्तीने ताब्यात ठेवल्याचा जुनाच राग आळवताना कधी ना कधी काश्मिरच्या नागरिकांना न्याय मिळवून देण्याची मल्लिनाथीही पाक लष्कराने केली आहे.

केवळ १७ दिवस पुरेल एवढी गंगाजळी पाकिस्तानकडे शिल्लक असताना तो देश देशोदेशी झोळी पसरून फिरत आहे. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि चीन अशा त्यांच्या मित्रांनीही पाकिस्तानकडे पाठ फिरविली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला मदत देण्यासाठी मुख्यत: भारताशी संबंध सुधारून व्यापार वाढविण्याची अट घातली आहे.

एवढे सगळे होऊनही पाक सरकार आणि लष्कर यांना अद्याप शुद्ध आलेली नाही. पाक सैन्याने काश्मिरच्या स्वातंत्र्याचे समर्थन करणारा विशेष कार्यक्रम केला. यात काश्मिरी जनतेवर भारताची दडपशाही वगैरे रडगाणी गाण्यात आली. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावानुसार काश्मीरमध्ये जनमत घेण्याच्या मागणीच्या शिळ्या कढीला ऊत आणला गेला आणि आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, हे ही सांगायला ते विसरले नाहीत.

हा कार्यक्रम पाक सरकार, लष्कर आणि जनता यांच्या वतीने आयोजित करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. वास्तविक पाकिस्तानची अवस्था इतकी वाईट आहे की, जनतेला रोजच्या खाण्याची भ्रांत आहे. वीज नाही. रॉकेल, पेट्रोल नाही. पीठ आणि मिठासाठी वणवण करण्याची पाळी आली आहे. सरकार एकीकडे मदत गोळा करण्याच्या आणि दुसरीकडे दहशतवादी कारवायांना आळा घालण्याच्या केविलवाण्या प्रयत्नात आहे आणि लष्कराला या नसत्या उठाठेवी सुचत आहेत.

अदानीच्या कथित घोटाळयांमुळे

# एलआयसी व सर्वसामान्यांच्या ठेवींना संरक्षण द्यावे या मागणीसाठी काँग्रेसची निदर्शने





**उस्मानाबाद : प्रतिनिधी**

सामान्य जनतेचा पैसा लाइफ इन्शुरन्स ऑफ इंडिया अर्थात एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये मोठ्या आस्थेने, आशेने व विश्वासाने ठेवलेला आहे. यातीलच गुंतवणूक अदानी उद्योग समूहात करण्यात आलेली आहे. तर अदानी उद्योग समूहाने मोठा घोटाळा केल्याचा आरोप करीत यामुळे एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडियामधील ठेवीदारांच्या रकमेला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडियाला संरक्षण द्यावे, या मागणीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्यावतीने एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडियासमोर दि.६ फेब्रुवारी रोजी जोरदार आंदोलन करीत निदर्शने करण्यात आली.

भारतीय जीवन विमा कंपनी व भारतीय स्टेट बँकेमध्ये सर्वसामान्यांच्या ठेवी ठेवण्यात आलेल्या आहेत. या पैशाची गुंतवणूक अदानीच्या उद्योग समूहात केली आहे. तर अदानीच्या विविध उद्योग समुहात मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा केल्याची पोलखोल हिंडेनबर्ग या वित्तीय संस्थेने करुन जगासमोर आणला आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांनी केलेली गुंतवणूक धोक्यात येण्याची शक्यता आहे या सामान्य लोकांच्या गुंतवणुकीला भारत सरकारने संरक्षण द्यावे व एलआयसी आणि सामान्य गुंतवणूकदारांना नुकसान पोहोचू नये याची काळजी घेण्यासाठी उचित कारवाई करावी या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी मोदी हटाव, देश बचाओ, एलआयसी बचाओ.. देश बचाओ, एसबीआय बचाओ.. देश बचाओ, अदानीच्या उद्योग समूहाची चौकशी झालीच पाहिजे, अदानीला पाठीशी घालणाऱ्या मोदी सरकारचा धिक्कार असो अशा प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ॲड धिरज पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, जिल्हा बँकेचे संचालक महेबूब पटेल, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, अभिजीत चव्हाण, महिला विभागाच्या प्रदेश महासचिव शीला उंबरे, जिल्हा उपाध्यक्षा ज्योती सपाटे, कळंब तालुकाध्यक्षा अंजली ढवळे, उमेश राजेनिंबाळकर, सिद्धार्थ बनसोडे, मानवाधिकार विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर लोंढे, ॲड राज कुलकर्णी, भूषण देशमुख, ॲड जावेद काझी, ॲड दर्शन कोळगे सुरेंद्र पाटील अमोल कुतवळ, आश्रुबा माळी, सलमान शेख, अब्दुल लतीफ, अभिजीत देडे, राहुल लोखंडे, विश्वजीत शिंदे, बालाजी माने, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष आयुब पठाण, अनंतराव घोगरे, अशोक बनसोडे मुनीर शेख, गणेश सापते, प्रणित डिकले, मेहराज शेख, सरफराज काझी, कळंब तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार, विश्वंभर मैंदाड, संजय गजधने, अमोल पाटील संजय कवडे, हसन शेख, अब्दुल लतीफ आदींसह काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' पुरस्कार जाहीर



डॉ. सदानंद मोरे | इंद्रजित भालेराव | मोनिका गजेंद्रगडकर | मंगेश काळे

**पुणे : प्रतिनिधी**

राजारामबापू पाटील ललित कला अकादमी, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने स्वर्गीय बापूंच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारे 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' अकादमीचे संस्थापक मार्गदर्शक, माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या अनुमतीने अकादमीचे निमंत्रक व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य कवी प्रदीप पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे घोषित केले. सन्मान पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून, माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व कलाक्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते पुणे येथे हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील, असे पाटील यांनी सांगितले.

साहित्य क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी प्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे (पुणे) यांना 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला जीवनगौरव सन्मान' जाहीर झाला असून, रू. ५० हजार, सन्मानचिन्ह व मानपत्र असे सन्मानाचे स्वरुप आहे. समकालीन चित्रकलेतील गुणवत्तापूर्ण योगदानाकरिता प्रसिद्ध चित्रकार मंगेश नारायणराव काळे (सोयगाव, औरंगाबाद), समकालीन कवितेतील गुणवत्तापूर्ण निर्मितीकरिता प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव (परभणी) आणि कथा साहित्यातील गुणवत्तापूर्ण निर्मितीकरिता प्रसिद्ध कथालेखिका मोनिका गजेंद्रगडकर (मुंबई) यांची 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. प्रत्येकी रु. २५ हजार, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या सन्मानाचे स्वरुप आहे.

प्रदीप पाटील म्हणाले, ''महाराष्ट्राच्या समाजकारणामध्ये आणि राजकारणामध्ये माणसाच्या हिताचा मूल्यात्मक विचार घेवून आपल्या रचनात्मक कार्याने शिक्षण, सहकार, कृषी, उद्योग अशा विविध क्षेत्रांचा विकास साधणाऱ्या राजारामबापू पाटील यांच्या विचारांची जोपासना व प्रसार राष्ट्रीय पातळीवर करण्याच्या भूमिकेतून अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. ललित कलांच्या माध्यमातून समाजाचे सांस्कृतिक उन्नयन करणाऱ्या प्रतिभावंतांचा सन्मान व्हावा, त्यांनाही स्वर्गीय बापूंच्या ध्यासपूर्ण जीवनातून निर्मितीच्या वेगळ्या वाटा उलगडत जाव्यात; या उदात्त हेतूने या सन्मान पुरस्काराचा उपक्रम हाती घेतला आहे. साहित्यासह संगीत, चित्र, शिल्प, नृत्य अशा ललित कलांमधील व लोककलेतील कलावंतांचे योगदान विचारात घेवून प्रतिवर्षी हे सन्मान दिले जातील''

साहित्याचे अभ्यासक डॉ. संजय करंदीकर, कासेगांव शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य आर. डी. सावंत, स्वीय सहाय्यक मोहन चव्हाण, प्रकाशक सुनिताराजे पवार, उद्योजक सुनिल चव्हाण, सतीश पाटील, साहित्यिक जगदीश कदम, डॉ. राजेंद्र माने, प्रा. मिलींद जोशी, उद्धव कानडे, डॉ. संदीप सांगळे, विश्वनाथ पाटसुते यांच्यासह महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील मान्यवरांचा अकादमीच्या कार्यकारिणी व सल्लागार समितीमध्ये समावेश आहे. अकादमीतील मान्यवर यांबरोबरच संजय ऐलवाड, वसंत पाटील, रघुराज मेटकरी, डॉ. अनिल मडके, अंजली कुलकर्णी, मनीषा पाटील, प्रा. संजीवनी वाघ, अनंत कदम, सुरेश आडके, सुभाष कवडे आदी साहित्यिक सदस्य समारंभाच्या यशस्वी संयोजनासाठी परिश्रम घेत आहेत.

# मुख्यमंत्री शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन

- **अशोका कन्स्ट्रक्शन व सातारा केमिस्ट असोसिएशन यांच्या सहकार्याने आज उपक्रमाचा शुभारंभ**

**सातारा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस ८ फेब्रुवारी रोजी विविध उपक्रमांनी साजरा होत आहे मुख्यमंत्री शिंदे यांचे कट्टर समर्थक अशोका कंस्ट्रक्शनचे प्रोप्रायटर संजय मोरे व सातारा केमिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे याची माहिती संजय मोरे व केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संजय मोरे पुढे म्हणाले सातारा जिल्ह्यातील ४२९० लोकांना आरोग्यदायी किटचे वाटप करण्यात येणार आहे सातारा शहरांमध्ये मतिमंदांच्या २२ शाळा ३३ आश्रम शाळा व १५ शासकीय वस्तीग्रह २३ वृद्धाश्रम असून या सर्व नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या समस्या या शिबिरातून जाणून घेतल्या जाणार आहेत या उपक्रमाचा शुभारंभ वळसे येथील एहसास या मतिमंद मुलांच्या शाळेतून होणार आहे या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी व महसूल यंत्रणेचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या आरोग्य शिबिरामध्ये मुलांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे मुलांना आरोग्यदायी सप्ताह निमित्त आवळा पावडर प्रोटीन पावडर गुलकंद इत्यादी साहित्यांचे किट दिले जाणार आहे मुलांच्या तपासणीमध्ये हेपेटाइटिस रक्त तपासणी तसेच शहराच्या इतर आजारात संदर्भातील माहिती घेऊन त्यांना योग्य ते उपचार भविष्यात दिले जातील असे प्रवीण पाटील यांनी सांगितले.

# आठवणीतले संगीतकार नौशाद साहेब...

### एक मुलाकात महान संगीतकार नौशाद साहब के बेटे राजू नौशाद के साथ...

**हाजी अजीजभाई मुजावर**



हिंदी सिनेमा सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार पद्मभूषण नौशाद यांची संगीत रचना संपूर्ण जगभरात आज ही अजरामर आहे. हिंदी सिनेमा सृष्टीत तब्बल पाच दशकं त्यांनी अखंड अधिराज्य गाजवल. आजही त्यांनी संगीतबद्ध केलेली हजारो गीते कानावर पडली की. काय ते संगीतकार, काय ती रचना ,सुमधुर संगीताने संपूर्ण जगाला नौशाद यांनी वेड लावलं होतं.

मिनी काश्मीर पुस्तकांचे गाव भिलार या गावाला संगीतकार नौशाद यांचा बंगला आहे. त्यांचे चिरंजीव राजू नौशाद नेहमीच भिलार गावाला राहण्यासाठी येतात .आमचे फॅमिली डॉक्टर निखिल बावडेकर यांच्या बंगल्यावर आवर्जून डॉक्टरांनी मला त्यांची भेट घेण्यासाठी बोलावले ..आणि भेट घेतल्यानंतर माझ्या आवडीचे संगीतकारांचे चिरंजीव राजू नौशाद यांच्या भेटीचा आनंद माझ्या वयाच्या ७६ व्या वर्षी मला मिळाला .गेली ५० वर्ष नौशाद यांच्या संगीतबद्ध केलेले अनेक सुमधुर गीत मी ऐकत आलो आहे. प्रत्यक्ष संगीतकार नौशाद यांना भेटण्याचा कधीच प्रसंग आला नाही.मात्र त्यांची कधीतरी भेट व्हावी अशी मनोमनी इच्छा कायम असायची .या सृष्टीतील सगळ्यात महान संगीतकार नौशाद यांची भेट म्हणजे त्या भेटीचा आनंद आगळावेगळाच असेल. मात्र प्रत्यक्ष त्यांचे चिरंजीव राजू नौशाद यांची भेट झाल्यानंतर प्रत्यक्ष संगीतकार नौशाद साहब यांना भेटण्याचा आनंद मिळाला.

आठवणीतले नौशाद सहाब ऐकण्याचे भाग्य मला मिळाले .सायंकाळचे सात वाजले होते राजू नौशाद अंगावर चॉकलेटी रंगाची शॉल पांघरून बसले होते बंगल्यात माझी इंट्री झाल्यावर डॉक्टर निखिल बावडेकरांनी माझी ओळख त्यांच्याशी करून दिली. संगीतकार नौशाद साहब यांचा चेहरा आणि त्यांचे चिरंजीव राजू नौशाद यांचा चेहरा हुबेहूब मिळता जुळताच होता. त्यांच्याशी गप्पा मारण्यास सुरू केल्यानंतर माध्यमांमध्ये ऐकलेली नौशाद सहाब यांची इंटरव्यू आणि त्यांचा आवाज सेम टू सेम त्यांचे चिरंजीव राजू नौशाद यांच्या ध्वनीतून समोरासमोर ऐकायला मिळाला

काही क्षण असे वाटले दस्तुरखुद्द नौशाद साहब माझ्याशी बोलतायेत की काय. आणि मग सुरू झाल्या जुन्या जमान्यातल्या चित्रपटांच्या गप्पा...

आणि त्याकाळची गाणी आणि संगीतबद्ध केलेले नौशाद साहब यांची संगीत कहानी ,वेगवेगळ्या आठवणीतल्या नौशाद साहेबांच्या खाजगी जीवनातल्या प्रसंग प्रत्यक्ष, त्यांच्या चिरंजीवांकडून ऐकल्यानंतर कधी नव्हे जे ऐकलेले नौशाद साहेब ऐकावयास मिळाले.

त्यांचे चिरंजीव राजू नौशाद यांनी सांगितलेला एक प्रसंग मनाला चटका लावून गेला. तो प्रसंग होता त्यांच्या अंतिम क्षणाचा मृत्यूच्या वीस मिनिटात आधीचा किस्सा . मृत्यूच्या वीस मिनिटे आधी नौशाद साहेबांनी राग भैरवी गायली हे ऐकल्यानंतर एक कलाकार आपल्या कलेला शेवटच्या श्वासापर्यंत कधीच सोडत नाही.

म्हणतात ना...

**कलाकार कधी मरता नही ।**
**उसे दफनाया जाता है।**
**कबर खोदकर देखो तालियों की गुंज सुनाई देगी।**

राजू नौशाद यांनी सांगितल्यानंतर अक्षरशा माझे डोळे भरून आले . या सृष्टीतील सगळ्यात महान संगीतकार म्हणून ते प्रत्यक्ष खाजगी जीवनात खूप दयावान दानधर्म करणारे दानशूर व्यक्ती होते , दुसऱ्यांवर प्रेम करणारे असे व्यक्तिमत्व पुन्हा कधी होणे नाही. लता मंगेशकर मुकेश, मोहम्मद रफी ,अशी अजरामर झालेली ही व्यक्तिमत्व ज्यांनी नौशाद साहेबांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी सिनेमा सृष्टीत आपल्या गायकीचं करिअर घडवलं. अशा महान व्यक्तिमत्त्वांना रुपेरी पडद्यावर कायमस्वरूपी अजरामर करणारे महान संगीतकार नौशाद साहेबांना कधीच विसरू शकणार नाही. नौशाद साहेब यांचे चिरंजीव राजू नौशाद यांच्याकडून आठवणीतले नौशाद साहेब ऐकताना तो अनुभव नक्कीच अविस्मरणीय आहे.